<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री. एस.जी.प्रभूखानोलकर यांचे मार्फत शपथेवर सुरु–</u>

**११.** हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी अन्वर बागवान हे माझे पुर्वीपासून भाडेकरु आहेत. हे म्हणणे खरे आहे की माझा जुना इमला नं.१८८ हा जळण्यापुर्वी प्रतिवादी यांना भाडयाने दिलेला गाळा हा माझ्या दुकानाच्या पुर्व दिशेला होता. हे म्हणणे खरे आहे की माझे दुकान जयंत स्टोअर्स् या नावाने पश्चिम दिशेला होते. हे म्हणणे खरे आहे की जुन्या गाळयात देखील प्रतिवादी याला बेकरीचा व्यवसाय सुरु करुन ३० ते ३५ वर्षे झालेली होती. माझा जुना इमला नं. १८८ हा सन २००९ मध्ये जळाला होता. हे म्हणणे खरे नाही की माझा जुना इमला नं. १८८ हा जळाल्यामुळे माझ्या दुकानाला व प्रतिवादी याच्या जुन्या गाळाला नुकसान झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की माझा जुना इमला नं. १८८ हा जळाल्यानंतर मी पायाचे आर.सी.सी.बांधकाम केले. साक्षीदार स्वतःहून सांगतो की केवळ घराचे आर.सी.सी.बांधकाम केले. हे म्हणणे खरे आहे की रस्त्याला लागून असलेल्या पडवीमध्ये माझा दुकान गाळा व प्रतिवादीचा जुना दुकान गाळा होता. हे म्हणणे खरे आहे की पडवीच्या पाठीमागे जो जुना इमला होता त्याचे मी आर.सी.सी.बांधकाम केले. हे म्हणणे खरे आहे की मी जेथे आर.सी.बांधकाम केले आहे तेथे ४ गाळे काढलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की मी आर.सी.सी.बांधकाम करीत असताना माझे थोरले बंधू शरदचंद्र यांनी या न्यायालयात दावा दाखल केला होता. माझ्या कुटुंबात आम्ही एकूण ४ भाऊ व २ बहिणी आहोत. माझा थोरला भाऊ शरदचंद्र याने जो दावा दाखल केला तो दाखल करण्यापुर्वी माझ्या बहिणींनी त्यांचा सामाईक मिळकतीमधील हक्क माझ्या लाभात सोडून दिला. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर आम्हा चौघां भावंडांमध्ये तडजोड झाली व माझ्या इतर भावंडांचा हिस्सा मी विकत घेतला. हे म्हणणे खरे आहे की अशा रितीने मी संपूर्ण मिळकतीचा एकटा मालक झालो. मी जे नव्याने चार गाळे बांधले त्यापैकी एक गाळा मी तडजोडीच्यावेळी पैसे उभे करण्यासाठी भावाला विकलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की उर्वरित तीन गाळे हे आता माझ्या वापरात आहे. हे म्हणणे खरे आहे की त्या तिन्ही गाळ्यामध्ये माझे पुर्वीचे जयंत स्टोअर्स हे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की माझा जुना इमला अस्तित्वात असताना रस्त्यापासून माझ्या घरात जाण्यासाठी एक चिंचोळी वाट होती. सदरची चिंचोळी वाट ही माझा गाळा व प्रतिवादीचा जुना गाळा यामधून जात होती. माझ्या व माझ्या भावामध्ये जी तडजोड झाली ती सन २०१७

मध्ये झाली होती. हे म्हणणे खरे आहे की जळालेल्या इमल्याचे पुनर्बांधकाम करीत असताना तेथे सिमेंट वगैरे नेण्यासाठी तेथे अस्तित्वात असलेली चिंचोळी वाट अपुरी पडू लागली. हे म्हणणे खरे नाही की त्यासाठी मी प्रतिवादी याला विनंती केली की, 'तुझा पुर्वेचा गाळा मला दे व त्याच्या बदल्यात मी तुला पश्चिमेकडील माझा गाळा देतो.' हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादीचा जुना गाळा हा माझ्या ताब्यात आला आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादीचा जुना गाळा हा तेथे अस्तित्वात नसून आता तेथे मोकळी वाट झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की मी जुन्या इमल्याच्या पाठीमागे उत्तरेला रहावयास आहे. माझे संपूर्ण कुटुंब त्या इमल्यात राहते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या मुळ इमल्याच्या पश्चिम बाजूला दोस्ती यांचा इमला आहे. हे म्हणणे खरे आहे की सडवेलकर हे दोस्ती यांच्या इमल्यामध्ये भाडेकरु म्हणून आहेत. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीकडे आजरोजी असलेल्या नवीन दुकान गाळयाच्या पश्चिमेला असलेली भिंत ही दोस्ती व आमची सामाईक भिंत आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे ती माझी भिंत आहे. प्रतिवादीच्या नवीन दुकान गाळयाच्या पाठीमागील भाग हा पत्र्याने लावलेला आहे, पुर्व भागाला देखील पत्रा लावलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की दुकानाचा समोरील भाग बंद करावयाचा असेल तर लाकडी फळी लावून बंद करावा लागतो. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीच्या जुन्या दुकान गाळ्याच्या आकारापेक्षा प्रतिवादीकडे आता असलेल्या नवीन दुकान गाळ्याचा आकार लहान आहे.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की जुन्या दुकान गाळयाचा आता कोणताही वाद राहिलेला नाही. माझ्या म्हणण्यानुसार मी प्रतिवादीला जुलै २०१६ मध्ये नवीन दुकान गाळा लायसन्सवर दिला. मी प्रतिवादीसोबत नवीन दुकान गाळ्याबाबतचा लायसन्सीचा लेखी करार केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की मी प्रतिवादी याला नवीन दुकान गाळा लायसन्स तत्त्वावर दिला यासाठी माझ्या तोंडी पुराव्याव्यतिरिक्त इतर कोणताही लेखी पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की नवीन गाळयाचा प्रतिवादीसोबत कोणताही लेखी करार नसल्याने त्याच्या नोंदणीचा प्रश्न येत नाही.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की मी नवीन दुकान गाळा प्रतिवादीला याला पुर्वीच्याच भाडेतत्त्वावर दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीच्या नवीन दुकान गाळयाचे भाडे

हे पुर्वीच्याच दुकान गाळयाप्रमाणे रक्कम रुपये ३०/– असे ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की दावा दाखल करे पर्यंत प्रतिवादीने मला रक्कम रुपये ३०/– प्रमाणे आजपर्यत सर्व भाडे दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की मला जुन्या दुकान गाळयाची गरज होती म्हणून मी प्रतिवादीकडून जुना दुकान गाळा घेतला व त्याला नवीन दुकान गाळा भाडोत्री तत्त्वावर दिला. हे म्हणणे खरे नाही की मी प्रतिवादी याला नवीन दुकान गाळा हा ११ महिन्यांसाठी लायसन्स तत्त्वावर रक्कम रुपये ५०००/– प्रतिमहा साठी दिला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी हे मला जुन्या गाळयाची भाडेरक्कम वेळोवेळी देत होते. परंतु त्यांच्या आईचे माझ्याशी संबंध चांगले असल्याने मी पावती दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की पावती न दिल्याने वाद होवू नये म्हणून जुन्या गाळयाचे सन १९८६ पासून व नवीन गाळ्याचे एप्रिल सन २०१७ पासून प्रतिमहा रक्कम रुपये ३०/– प्रमाणे एकूण रक्कम रुपये ११,१६०/– एवढी भाडे रक्कम डिमांड ड्राफ्ट म्हणून प्रतिवादीने मला पाठविलेली आहे व ती मी स्वीकारली आहे. हे म्हणणे खरे नाही की मला मिळालेल्या डिमांड ड्राफ्टच्या अनुषंगाने मी प्रतिवादीला दिलेल्या नोटीस उत्तरामध्ये व दाव्यामध्ये जो भाडे रक्कमेबाबत हिशोब दिलेला आहे तो धांदांत चुकीचा व खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीकडे रक्कम रुपये ४०,०००/– इतके भाडे थकीत आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की नवीन गाळा हा जुन्या गाळ्याप्रमाणेच रक्कम रुपये ३०/– प्रतिमहा प्रमाणे भाडेतत्वावर दिलेला असल्याने रक्कम रुपये ४०,०००/– इतके भाडे थकीत असल्याचा प्रश्नच येत नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासाच्या परिच्छेद क्रमांक ८ मधील मजकूर , 'एवढेच नव्हेतर प्रतिवादी हा गावात असे बोलू लागला की, पुर्वी जसे मी भाडे दिले नाही तसे याचे भाडे देणार नाही, मी ११ महिन्यांनंतर जागा खाली करणार नाही' हे मी खोटे सांगत आहे.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की राम मारुती मंदिर रस्त्यावर प्रतिवादी यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादीचा नवीन दुकान गाळा हा भर बाजारात आहे. हे म्हणणे खरे आहे की नवीन दुकान गाळयामध्ये प्रतिवादीचा डायमंड बेकरी उत्पादन विक्रीचा व्यवसाय सुरु आहे. या बेकरी व्यवसायावरच प्रतिवादीच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की माझा दुकान गाळा हा व्यवस्थीत सुरु असल्याने मला प्रतिवादीच्या नवीन गाळयाची गरज नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीच्या कुटुंबाचा उदर

निर्वाह नवीन गाळयातील बेकरी उत्पादन व्यवसायावर अवलंबून असल्याने प्रतिवादीला नवीन दुकान गाळ्याची खरी गरज आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी कडून त्याच्या नवीन गाळयाचा कब्जा घेतला तर त्याच्या व त्याच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येवू शकते.

**१५.** मला तीन मुली आहेत. त्यांची लग्ने झालेली असून त्या आपापल्या सासरी नांदत आहेत. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीच्या नवीन गाळयाची मला वाजवी गरज नसताना तसेच प्रतिवादी मला नियमित भाडे देत असून देखील मी प्रतिवादीविरुध्द खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी हा मला नवीन गाळयाचे भाडे रक्कम द्यायला आला ती मी स्वीकारली नाही. मी प्रतिवादीकडून भाडे रक्कम रुपये ३०/– प्रतिमहा स्वीकारली नसल्याने प्रतिवादी ती भाडे रक्कम न्यायालयात नियमितपणे भरतात किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी प्रतिवादीसोबत नवीन दुकान गाळयासंदर्भात कोणताही लेखी करार केलेला नसल्याने मला दाव्यात मागणी केल्याप्रमाणे प्रतिवादीकडून नवीन दुकान गाळयाचा कब्जा मागण्याचा तसेच नवीन दुकान गाळ्याचा प्रतिमहा भाडे रक्कम पाच हजार मागण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीकडून कोणतीही भाडे रक्कम थकीत नसताना मी प्रतिवादीविरुध्द धांदांत खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–
(के.के.पाटील)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.

दिनांक– १३/०७/२०२३.